माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

तक्रार क्रमांक : २५२/२०२४

तक्रारकर्ता	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी
श्री. प्रणय अरविंद शेटे, रा. २७, जयंती नगरी ३, मनीष नगर जवळ, बेलतरोडी, नागपूर - ४४०००५	अधिक्षक वर्ग – २ (सा.रा.से.), शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर	शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर

अंतरिम आदेश दिनांक : २३.०४.२०२६

अंतीम आदेश दिनांक : २२.०९.२०२६

निर्णय

तक्रारकर्ता, श्री. प्रणय अरविंद शेटे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अंतर्गत आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. २४००/२०२१ मध्ये दिनांक ११.०९.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने सदर तक्रार अर्जावर आयोगाने दिनांक २३.०४.२०२६ रोजी सुनावणी घेऊन पुढीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित केले आहे.

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग – २ (सा.रा.से.), शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी द्वितीय अपील क्र. २४००/२०२१ मध्ये दिनांक ११.०९.२०२३ रोजी पारीत केलेल्या अंतिम आदेशाचे काटेकोरपणे पालन करुन त्याचा अनुपालन अहवाल सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास सादर करावा.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग – २ (सा.रा.से.), शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी आयोगाने दिनांक ०३.०५.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन का केले नाही? याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही, तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३) या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक ०८.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयोगाकडे पुढीलप्रमाणे लेखी खुलासा सादर केला आहे.

"मा. आयोगाने द्वितीय अपील क्र. २४००/२०२१ मध्ये दिलेल्या आदेशाचे पालन करण्याच्या उद्देशाने, मी अपिलार्थी श्री. प्रणय शेटे यांना दिनांक २७.०६.२०२४ रोजी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून अभिलेख अवलोकनासाठी वेळ निश्चित करून दिली होती. सदर दिवशी अपिलार्थी हजर झाले होते आणि त्यांच्या विनंतीनुसार त्यांना आवश्यक माहिती लिखित स्वरूपात कळविण्यास सांगितले होते, जेणेकरून सुस्पष्ट माहिती पुरवता येईल.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती (नवचैतन्य प्राथमिक शाळेतील १२ शिक्षकांच्या भरतीबाबतची नस्ती) या कार्यालयातील विशिष्ट कार्यासनाशी संबंधित होती. माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ५(४) नुसार, मी संबंधित कर्मचाऱ्यास श्री. योगेश राठोड (वरिष्ठ सहाय्यक) आणि श्री. प्रथमादित्य गोंडाणे (कनिष्ठ सहाय्यक) यांना पत्र क्र. ५५५९ (दिनांक ०३.०७.२०२४) अन्वये सदर माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्याचे लेखी निर्देश दिले होते.

संबंधित कर्मचाऱ्यांना (मानिव जन माहिती अधिकारी) माहितीचा शोध घेण्याचे निर्देश देऊनही, त्यांच्या स्तरावरून माहिती वेळेत प्राप्त न झाल्याने आयोगाच्या आदेशाचे पालन करण्यास विलंब झाला आहे. माझा हेतू माहिती दडवण्याचा किंवा आयोगाच्या आदेशाचे अवमान करण्याचा कधीही नव्हता. प्रशासकीय कामाचा व्याप आणि संबंधित कार्यालयाकडून मिळालेल्या अपूर्ण प्रतिसादामुळे ही तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे.

माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ५(५) नुसार, ज्या अधिकाऱ्यांचे साहाय्य मागितले आहे, ते या विलंबासाठी 'मानीव जन माहिती अधिकारी' म्हणून जबाबदार ठरतात. मी माझ्या स्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करून अपिलार्थींना अवलोकनाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मी आयोगाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत, तरीही झालेल्या विलंबाबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. या प्रकरणात माझा कोणताही दोष किंवा दुर्लक्ष नसल्यामुळे, माझ्यावर कलम २०(१) अन्वये प्रस्तावित केलेली शास्तीची (दंडाची) कारवाई करण्यात येऊ नये, ही नम्र विनंती. यापुढे आयोगाच्या सर्व आदेशांचे तंतोतंत पालन करण्याची मी ग्वाही देतो."

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे निदर्शनास येते की, सदर प्रकरणी आयोगाचे अंतरिम आदेश दिनांक २२.०५.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर निर्गमित केलेल्या अंतरिम आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक-वर्ग २ (सा.रा.से), शिक्षण विभाग (प्राथ.)

जिल्हा परिषद, नागपूर यांनी तक्रारकर्त्यास मागणी केलेल्या मूळ कागदपत्रांचे अवलोकन देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती एकूण २९ पृष्ठांमध्ये दिनांक २३.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सदर पत्रावर तक्रारकर्ता यांची स्वाक्षरीनिशी पोच दिसून येते. त्याचप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगास सादर केलेला आहे. सदर लेखी खुलाश्यामध्ये असे दिसून येते की, मानिव जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित वेळेत माहिती प्राप्त न झाल्यामुळे तसेच प्रशासकिय कामाच्या व्यापामुळे तक्रारकर्त्यास माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे **त्यांचे म्हणणे मान्य करीत सादर केलेला लेखी खुलासा मान्य करुन झालेला विलंब क्षमापित करुन प्रस्तुत तक्रार अर्ज अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

आदेश

प्रस्तुत तक्रार अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २२.०९.२०२६

जावक क्रमांक ८८२९ दिनांक 19 OCT 2026